**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री एस.एस. कुदळे -**

५. माझे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झाले आहे. मी प्रस्तुत फिर्यादी कंपनीत सन २०13 पासून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतापगड साखर कारखाना भाडेतत्त्वावर गोदावरी साखर कारखाना यांनी कोणत्या साली घेतला होता याविषयी मला माहिती नाही. सदरचा भाडेतत्वाचा कालावधी पाच वर्षांकरीताचा होता. तो किती रकमेकरीता होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४८ वरील श्री.एस.एन.बाबलेश्वर यांची कथित सही माझ्यासमक्ष करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, संबंधिताचे ऊसतोडीणी वाहतूक इत्यादी बाबतचे करार हा कारखान्यातील शेती अधिकारी करीत असतो. हे म्हणणे खरे आहे की, केन अकाऊंट हा विभाग ऊसाची बिले तयार करणे याकरीता असतो. हे म्हणणे खरे नाही की, करारनामा करतेवेळी शेती अधिकारी संबंधीत कंत्राटदारकडून कोरे धनादेश स्वीकारतो.

६. दि. ११.१२.२००६ रोजीच्या माझ्या साक्ष शपथपत्रात परिच्छेद क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या धनादेशाबाबत आरोपीस कायदेशीर नोटीस देण्याकरीता फिर्यादी कारखान्यास कोणतीही अडचण नव्हती. सदरचा धनादेश फिर्यादीतर्फे दि. ११.१२.२००६ रोजीच बँकेत वटण्याकरीता सादर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबचे कागदपत्र प्रस्तुत प्रकरणात दाखल नाहीत. माझ्या साक्षशपथपत्रात तीन सुट्या टोळयांबाबत नमुद आहे त्याचा अर्थ म्हणजे प्रत्येक टोळीत दहा ऊसतोड कामगार अशाप्रकारे तीस ऊसतोड कामगार असा आहे. सदरील तीस ऊसतोड कामगारांशी कारखान्यांनी करार केले नव्हते. सदरील कामगारांची यादी कंत्राटदाराकडे होती.

७. ऊस गळीत हंगाम दरसाल नोव्हेंबर महिन्यात सुरु होवून एप्रिल महिन्यात संपतो. आरोपीने कंत्राटदार म्हणून नेमके कधी काम सुरु केले व कधी संपविले याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कारखान्याचे केन मॅनेजर यांनी कथित करारनाम्याच्यावेळी आरोपीकडून दोन कोरे धनादेश व एक कोरा स्टॅम्प पेपर घेतला होता. हे

म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी फिर्यादी कारखान्यात नोकरीवर नव्हतो आणि म्हणून त्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, एप्रिल २००७ साली आरोपीकडून र.रु.३,६८,५६०/- येणे बाकी असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील रकमेचा धनादेश आरोपीने कधीही फिर्यादी कारखान्यास दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी हा फिर्यादीस सदरची रक्कम देणे लागत नाही.

**प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकुब.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई

दिनांक :- २६/१२/२०२५